केंद्र शासनाचा “दिव्यांग व्यक्तीचा हक्क कायदा २०१६” (The Rights of Persons with Disabilities Act, २०१६) मधील कलम-२३ नुसार नियोजन विभागाच्या अधिपत्याखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालय व त्यांची प्रादेशिक कार्यालये येथे “तक्रार निवारण अधिकारी (Grievance Redressal Officer)” नियुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन आदेश क्रमांक : संकीर्ण १०१९/प्र.क्र.६७/का.१४२७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०१ ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना :

केंद्र शासनाचा “दिव्यांग व्यक्तीचा हक्क कायदा २०१६” (The Rights of Persons with Disabilities Act, २०१६) मधील कलम-२३ च्या तरतुदींनुसार या विभागाच्या अधिपत्याखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालय व त्यांची प्रादेशिक कार्यालये, कोकण विभाग (नवी मुंबई), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथे “तक्रार निवारण अधिकारी (Grievance Redressal Officer)” यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

शासन आदेश :

केंद्र शासनाचा “दिव्यांग व्यक्तीचा हक्क कायदा २०१६” (The Rights of Persons with Disabilities Act, २०१६) मधील कलम-२३ च्या तरतुदींनुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या मुख्यालयात उपसंचालक (प्रशासन) तसेच प्रादेशिक कार्यालय, कोकण विभाग (नवी मुंबई), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर मधील उपसंचालक यांना दिव्यांग व्यक्तींच्या तक्रारींसंदर्भात “तक्रार निवारण अधिकारी (Grievance Redressal Officer)” म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदरहू “तक्रार निवारण अधिकारी (Grievance Redressal Officer)” यांनी तक्रारींची नोंद स्वतंत्र नोंदवहीत (Register of Complaints) ठेवावी तसेच दिव्यांग व्यक्तींच्या तक्रारींचा प्राधान्याने निपटारा करावा.

२. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन आदेश उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०८०११६४६३६२२१६ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Tushar Purushottam Hirlekar
Digitally signed by Tushar Purushottam Hirlekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6dd848a31422ed36ba4503d4744b6dc20833c851babace12b16b7bba3f67cca2, cn=Tushar Purushottam Hirlekar
Date: 2019.08.01 18:07:06 +05'30'

(तु. पु. हिर्लेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

२) सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, कोकण विभाग (नवी मुंबई), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.

३) उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग (नवी मुंबई), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.

४) उपसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, कोकण विभाग (नवी मुंबई), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.

प्रत :

१) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२) मुख्य सचिवांचे उपसचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

३) निवडनस्ती.